पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018.
क्र.प्रशा/2/काвि/५६२ /2014
दिनांक १२ /12/2014

विषय:- वाहनचालकांचे कामकाजाबाबत.....

परिपत्रक,

महापालिका आस्थापनेवरील अग्निशामक, आरोग्य, रुग्णवाहिका इ. विभागांतील वाहने वगळता अन्य सर्व अधिकारी/पदाधिकारी तसेच कार्यालयीन वापराचे वाहनांवरील वाहनचालकांची दैनंदिन कामकाजाची वेळ सकाळी 9.00 ते सायंकाळी 6.00 अशी आहे. महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीचे आवारात वाहनचालकांसाठी विश्रांती कक्ष आहे. वाहनचालकांनी अधिकारी/पदाधिकारी हे मुख्य कार्यालयात असलेल्या वेळेत विश्रांती कक्षाचा वापर करणे अपेक्षीत आहे.

तथापि वाहनचालक कर्मचारी आपले कामकाजाचे वेळेत तसेच कामकाजाचे वेळेनंतर जास्त वेळ थांबून विश्रांतीकक्षात गैरवर्तन करतात असे माझे निदर्शनास आले आहे.

सबब या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधित वाहनचालकांना सूचीत करणेत येते की, त्यांनी आपले दैनंदिन कामकाजाचे वेळेअगोदर किमान 15 मिनीटे उपस्थित राहून वाहन आऊट करावे व संबंधित अधिकारी/पदाधिकारी यांचेकडे जावे. महापालिका कामकाजासाठी पदाधिकारी/अधिकारी यांनी दैनंदिन कामकाजाचे वेळेपूर्वी व वेळेनंतर उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्यास त्याप्रमाणे कामावर उपस्थित राहून कामकाज करावे. कोणत्याही परिस्थितीत सकाळी वाहन आऊट करणेपूर्वी व वाहन जमा केल्यावर वाहनचालकांनी विश्रांती कक्षात व अन्यत्र थांबू नये. याबाबत संबंधित अधिका-यांनी वाहनचालकांना सूचना दयाव्यात.

त्याचप्रमाणे महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीचे आवारातील वाहनचालकांचा विश्रांती कक्ष सुरक्षा विभागाने सकाळी 9.00 ते 6.00 या वेळेत उघडून दयावा. सदर विश्रांती कक्ष संध्याकाळी 6.00 नंतर सुरक्षा विभागाने बंद करावा. कामकाजाचे वेळेत वाहनचालकांचे विश्रांती कक्षात तसेच कामकाजाचे वेळेपूर्वी व वेळेनंतर कोणतेही अनुचित/ गैर वर्तन घडणार नाहीत याची सर्व वाहनचालकांनी दक्षता घ्यावी. याबाबत यापुढे कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास संबंधितांवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करणेत येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. सुरक्षा अधिकारी यांनी याबाबत दैनंदिन तपासणी करुन कामकाजाचे वेळेमध्ये विश्रांतीकक्षात अथवा मुख्य प्रशासकीय इमारतीचे आवारात अनुचित/गैर वर्तन करताना आढल्यास किंवा वाहन जमा केल्यावर वाहनचालक थांबल्याचे आढळल्यास त्याबाबत संबंधित कर्मचा-यांचे नावांसह गैरवर्तनाचा अहवाल प्रशासन विभागाकडे पाठवावा. प्रस्तुत परिपत्रक सर्व वाहनचालकांचे निदर्शनास आणून देण्यात यावे व त्याबाबत त्यांची पोहोच घेणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 18

प्रति,
1. सुरक्षा अधिकारी, पिंपरी चिंचवड मनपा.
2. सर्व विभाग.

प्रत:- पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ.